
साप्ताहिक लोकप्रभा

लोकसत्ता
१० जून २०११







राजू परुळेकर

raju.parulekar@gmail.com



अण्णांच्या लोकलढय़ाला मिळालेला प्रतिसाद आणि माध्यमांची साथ ही रामदेवबाबांच्या अहंकाराला प्रदीप्त करणारी ठरली. रामदेवबाबा अण्णांचं उपोषण संपल्यापासून चुळबुळू लागले. त्यांना काहीतरी केल्याशिवाय स्वस्थ बसणं शक्यच नव्हतं. त्यातूनच त्यांनी प्रस्तावित चार जूनचं नवं भ्रष्टाचारविरोधी उपोषण जाहीर केलं. हे करताना आपली अधिक जहाल देशभक्ती आणि अतिरेकी जहाल विधानं याचं प्रदर्शन करायला ते अजिबात विसरले नाहीत.






योग गुरू रामदेवबाबा हे ज्या क्षेत्रात पारंगत आहेत ते क्षेत्र सोडून अन्य क्षेत्रात त्यांना आता अधिक रुची उत्पन्न झालेली आहे. योग सर्वसामान्यांपर्यं[illegible] clickable-dropdown.zip [illegible]ांचा मोठा वाटा आहे हे मान्य करूनही त्यांच्या या योगासंबंधाच्या यशात संपर्क साधनात झालेली क्रांती ही काही दृष्टीआड करता येणार नाही. संपर्काची अनेक वाहिन्यांपासून ते मोबाइल फोनपर्यंतची अनेक साधने रामदेवबाबांच्या योगविषयक प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावत होती. तरीही भारतासारख्या देशात जिथे सामान्य माणसाचं आरोग्य हे कवडीमोलाचं मानलं जातं नि अनेक श्रीमंत बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातातलं ते खेळणं असतं. तिथे रामदेवबाबांनी योगाचं पुनरुज्जीवन करून सामान्य माणसाच्या स्वत:च्याच आरोग्याविषयीच्या नि आरोग्याबद्दलच्या संवेदनशीलतेविषयी सामान्य माणसाला जागं केलं. जीवनशैलीतल्या धोकादायक बदलांविषयी हजार पुस्तकं जे काम करू शकणार नाहीत ते काम रामदेवबाबांनी सहजगत्या केलं. साधी साधी माणसंही दुधीचा रस, प्राणायाम, अनुलोम विलोम वगैरे शब्द अगदी सहजगत्या वापरू लागली.

पण हे कार्य करताना रामदेवांचा अहंकार वाढत गेला. तो त्यांच्या बोलण्यातही दिसू लागला. बोलताना अतिरेकी विधाने करण्याची त्यांची सवय होतीच. त्यात आपल्या महानतेबरोबरच समोरच्याचा कमीपणाही ते सहजपणे बोलू लागले. आपला मुद्दा पोहचवण्याइतकाच किंबुहना त्यापेक्षाही त्यांना समोरच्याला धोबीपछाड घालण्यात जास्त रस वाटू लागला. वास्तविक पाहता यांची त्यांना काही गरज नव्हती. नि योगी या विशेषणाशीही ते विसंगतच होतं. पण माणसाची गाडी अहंकाराच्या ट्रॅकवर गेली की त्याला कोण रोखणार? अशा अहंकाराच्या विळख्यातून भलेभले योगी सुटू शकले नाहीत तर रामदेवबाबांकडून तरी कसली अपेक्षा करणार?

भगवान बुद्ध याला 'गाठ छोटी होऊन पक्की होणं' असं म्हणतात. छोटय़ा माणसाचा अहंकार हा धाग्याला पडणाऱ्या मोठय़ा सुटय़ा गाठीसारखा ओबडधोबड असतो. ती गाठ नजरेला चटकन दिसते. हाताला लागते. नि त्यामुळे चटकन उसवता येते. पण मोठय़ांचा, थोरांचा अहंकार घट्ट, बारीक हाताला न लागणाऱ्या, न दिसणाऱ्या व त्यामुळे न उसवणाऱ्या दोऱ्याच्या पक्क्या गाठीसारखा असतो.

भगवान बुद्धांचं हे रुपक रामदेवबाबांना तंतोतंत लागू पडतं. रामदेवबाबा हे योगी या बिरुदावलीला शोभणार नाही अशा तऱ्हेने भडक विधानं करण्याकरता हळूहळू प्रसिद्ध पावू लागले. अंगावर वाद ओढवून घ्यायचा नि त्यायोगे प्रसिद्धीमाध्यमांचं लक्ष आपल्याकडे वळेल याची खात्री करून घ्यायची. ज्या वाहिन्यांवर रामदेव यांचे कार्यक्रम दाखवले जातात त्या मेनस्ट्रीम वाहिन्या नसल्याने मेनस्ट्रीम वाहिन्या नि वृत्तपत्रे यांचं लक्ष सतत आपल्यावर कसे केंद्रीत राहिल याबाबत रामदेव फारच हळवे झाले. समाजकारणाच्या नावाखाली राजकारणातील वाद आपल्यावर ओढवून घेण्याची रामदेवांना सतत गरज भासू लागली. आपण फोकसच्या बाहेर जातो ही गोष्ट त्यांना कदापि सहन होईना. आता रामदेवबाबा प्रसिद्धीच्या झोतासाठी तडफडतात.

या साऱ्या मानसिकतेचा परिणाम म्हणूनच रामदेवबाबांनी सुरुवातीला अण्णा हजारेंच्या आंदोलनात प्रवेश करून त्याचा प्रकाश स्वतवर पाडून घेतला. पण त्या आंदोलनामुळे अण्णा राष्ट्रनेते झाले हे बघून रामदेवबाबांचे अहंकारी मन खट्टू झालं. वास्तविक रामदेवबाबांनी या एका मोठय़ा लढय़ात योगव्यावसायिक म्हणून आपल्या असणाऱ्या प्रभावाचा उपयोग केला नि आपलं त्या लढय़ातलं योगदान दिलं.

लोकपाल विधेयक हा त्या लढय़ाचा एक टप्पा आहे. तो टप्पा पूर्ण झाल्यावर दुसऱ्या टप्प्याकडे वळणं अधिक सोपं आणि सधन होईल. शिवाय अण्णा जसे देवळात राहून पूर्णवेळ समाजकारण करतात तसं रामदेवबाबांचं नाही. त्यामुळे अण्णांकडे भ्रष्टाचारविरोधी लढय़ाचं नेतृत्व असणं खूप स्वाभाविक आहे. शिवाय या लढय़ाचं नेतृत्व समाजातल्या कोणत्याही निरपेक्ष माणसाकडे असणं काही गैर नाही. शिवाय लढय़ातल्या सर्वच माणसांनी स्वयंघोषित सेनापतित्व आपल्या हातात घेणं धोकादायक. आपापल्या जागी प्रत्येकाने पाय रोवून उभं राहाणं हेच योग्य.

मेनस्ट्रीम वाहिन्या नि वृत्तपत्रे यांचं लक्ष सतत आपल्यावर कसे केंद्रीत राहिल याबाबत रामदेव फारच हळवे झाले. समाजकारणाच्या नावाखाली राजकारणातील वाद आपल्यावर ओढवून घेण्याची रामदेवांना सतत गरज भासू लागली. आपण फोकसच्या बाहेर जातो ही गोष्ट त्यांना कदापि सहन होईना. आता रामदेवबाबा प्रसिद्धीच्या झोतासाठी तडफडतात.

पण हे रामदेव बाबांना कोण सांगणार? अण्णांच्या लोकलढय़ाला मिळालेला प्रतिसाद आणि माध्यमांची साथ ही रामदेवबाबांच्या अहंकाराला प्रदीप्त करणारी ठरली. रामदेवबाबा अण्णांचं उपोषण संपल्यापासून चुळबुळू लागले. त्यांना काहीतरी केल्याशिवाय स्वस्थ बसणं शक्यच नव्हतं. त्यातूनच त्यांनी प्रस्तावित चार जूनचं नवं भ्रष्टाचारविरोधी उपोषण जाहीर केलं. हे करताना आपली अधिक जहाल देशभक्ती आणि अतिरेकी जहाल विधानं याचं प्रदर्शन करायला ते अजिबात विसरले नाहीत. सुरुवातीला ते अण्णांबद्दल बरं बोलले. पण नंतर त्यांच्या अहंकाराच्या डोक्यावरून पाणी जायला लागलं तेव्हा त्यांनी बेलगाम विधानांचे जबर षटकार लगावण्यास सुरुवात केली.

''मी राजकारणात वीस वर्षं आहे. अण्णांचा अनुभव त्यामानाने नवा. ते दोनच वषर्ं आहेत.'' अशा स्वरूपाची कल्पित आणि व्यक्तिगत जळफळाटातून उत्पन्न झालेली विधानं करायला त्यांनी सुरुवात केली. त्यांच्या भंपक विधानांपलीकडची एक गोष्ट त्यांच्या लक्षात अहंकारामुळे आली नाही. ती म्हणजे ते स्वत: एक (यशस्वी) योगव्यावसायिक आहेत. हा व्यवसाय करतानाचे स्वत:चे सर्व चोचले ते पुरवून घेतात. यात व्यावसायिक म्हणून गैर काही नसलं तरी लोकनेता होण्यासाठी हा खचितच उणेपणा आहे. विशेषत: अण्णांसारख्या साधुत्व जगणाऱ्या माणसांशी स्पर्धा करताना! भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची धडकी भरलेल्यांना रामदेवबाबांसारखी अहंकाराने भारलेली माणसं मूळ आंदोलनात फूट पाडण्यासाठी हवीच आहेत. ''आपल्या योगबलावर आपण कितीही दिवस उपास करू शकतो, असा नवा अहंकारबाण, अण्णा त्यामानाने उपोषणाच्या क्षेत्रात नवे आहेत'' या पुरवणीसहित रामदेवबाबा कधी सोडतात ते आता बघायचं. कारण ज्यांना या मूळ आंदोलनात फूट पाडायची आहे. ते रामदेवबाबांच्या अहंकाराला हवा देत सुटलेत. शिवाय या साऱ्यातून रामदेवबाबांचा काही फायदा न होता त्यांचंही हसंच होणार आहे.

पण अहंकारासनात लटकलेल्या रामदेवबाबा या योगव्यावसायिकाला हे कोण समजवणार?

मुखपृष्ठ
तथ्यांश
तथास्तु
फुल्या फुल्या डॉट कॉम
डेस्क टॉप
कव्हर स्टोरी
उपचार पद्धती
सुरक्षा
डिटॉक्स
मेतकूट
हास्यविनोद
चित्रपट
गंधर्व आख्यान
भरारी
माझी बाहेरख्याली
गंध आरोग्याचा
मुंबई टॉकीज्
श्रीमान श्रीमती
शॉपिंग
तडका मारके
वाचक प्रतिसाद
भविष्य
संपर्क
मागील अंक

इंडियन एक्स्प्रेस ग्रुप

Advertise with us